महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०१ वा | दिनांक : १५/०१/२०२५ | वार : बुधवार

## परळीला स्वतंत्र राष्ट्र घोषित करा : धनंजय मुंडेंना तिथला पंतप्रधान करा, जितेंद्र आव्हाड



**मुंबई** : संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता चांगलाच वेग आला असल्याचे दिसत आहे. या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा दाखल झाल्याची माहिती कळताच परळी येथे कराड कुटुंबीय तसेच समर्थकांनी परळी बंदची हाक दिली. तसेच या आंदोलनात वाल्मीक कराडची आई देखील सहभागी झाल्याचे दिसून आले. एकंदरीतच परळीमध्ये काहीसे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर आता राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याच्यावर ३०७ देखील दाखल करा अशी मागणी जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. जितेंद्र आव्हाड म्हणाले, परळीला स्वतंत्र राष्ट्र घोषित करा आणि धनंजय मुंडेंना पंतप्रधान घोषित करा, असा टोला आव्हाड यांनी लगावला आहे. तसेच परळीमध्ये अजूनही अनेक पोलिस अधिकारी वाल्मीक कराडनेच नेमलेले आहेत, असा आरोपही जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

दरम्यान, वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याची माहिती कळताच कराड कुटुंब व समर्थकांनी आंदोलन सुरू केले. यावेळी जाणून बुजून वाल्मीक कराडला अडकवले जात असल्याचा दावा कराडच्या आईने केला आहे. तसेच त्यांच्यावरील गुन्हा जोपर्यंत मागे घेतला जात नाही तोपर्यंत आम्ही आंदोलन करणार अशी भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. परळीमध्ये काही समर्थकांनी स्वतःवर ज्वलनशील पदार्थ टाकत स्वतःला पेटवण्याचा देखील प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

वाल्मीक कराडवर गुन्हा दाखल होताच परळी बंदची हाक देण्यात आली. याला परळीमधील व्यापाऱ्यांनी देखील पाठिंबा देत आपली दुकाने बंद ठेवल्याचे दिसून आले. काही भागात टायर जाळत समर्थकांनी निषेध व्यक्त केला तर दुसरीकडे एसटी बसवर दगडफेक झाल्याची देखील घटना घडली आहे. त्यामुळे परळी येथील परिस्थिती तणावपूर्ण झाल्याचे पाहायला मिळाले.

## अखेर वाल्मीक कराडला मकोका : परळीमध्ये राडा



**परळी** : संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी प्रकरणात अटक असलेला आरोपी याच्यावर मकाको लावला असून त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. ही माहिती समजताच वाल्मीक कराड समर्थकांनी परळी शहर बंदची हाक दिली आहे. कराड समर्थकांनी रस्त्यावर उतरुन दुकाने बंद करण्याचे आवाहन केले. त्यानंतर व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद केली. अत्यावश्यक सेवा वगळता परळीतील संपूर्ण बाजारपेठ बंद झाली असून रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

खंडणी प्रकरणात अटकेत असलेल्या वाल्मीक कराडची १५ दिवसांची पोलिस कोठडी संपल्यानंतर आज न्यायालयात हजर करण्यात आले होते. या प्रकरणावर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. तसेच, वाल्मीक कराडवर मकोका कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही सीआयडीकडून सांगण्यात आले आहे. ही बातमी समजताच वाल्मीक कराड समर्थक आक्रमक झाले असून परळी बंदची हाक देण्यात आली.

वाल्मिक कराडवर कारवाई करण्यात आल्यानंतर वातावरण चांगलेच तापले आहे. परळीमधील सर्व दुकाने बंद करण्यात आली असून सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे. वाल्मीक कराड समर्थक रस्त्यावर दिसत आहेत. आज सकाळी वाल्मीक कराडच्या समर्थकांनी परळीतील राणी लक्ष्मीबाई टॉवरजवळ जोरदार निदर्शने केली. यादरम्यान टायर जाळण्याचा प्रयत्न झाला, पण पोलिसांनी हा प्रकार रोखला. दुसरीकडे वाल्मीक कराडच्या पांगरी गावातही परळी बीड रस्त्यावर कार्यकर्त्यांनी टायर जाळले.

दरम्यान, आज सकाळपासून वाल्मीक कराडच्या समर्थनार्थ परळीतील पोलिस ठाण्यासमोर आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी महिलांकडून आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार सुरेश धस यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले.

## पुढील मकर संक्रांतीपर्यंत ठाकरे-फडणवीस एकत्र : आमदार रवी राणा



**अमरावती** : पुढील मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दिसतील, असे वक्तव्य आमदार रवी राणा यांनी केले आहे. रवी राणा यांच्या या विधानामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी तिळगूळ खा आणि गोड गोड बोलावे अशी विनंती आहे, असेही रवी राणा यांनी म्हटले.

राज्यात सरकार स्थापन झाल्यापासून भाजप आणि ठाकरे गटाची जवळीक वाढत असल्याचे दिसून येत आहे. विधीमंडळाच्या अधिवेशनादरम्यान उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तर आदित्य ठाकरे हे देखील आतापर्यंत तीन वेळा देवेंद्र फडणवीसांच्या भेटीसाठी गेले होते. शिवाय ठाकरे गटाच्या 'सामना'मधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आले. तसेच उद्धव ठाकरे माझे शत्रू नाहीत, असे विधान फडणवीसांनी केले होते. या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना रवी राण यांनी उपरोक्त मोठा दावा केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

राज्याच्या परिवर्तनामध्ये उद्धव ठाकरेंनी तिळगूळ खावे आणि गोड गोड बोलावे अशी विनंती असल्याचे रवी राणा म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांना भेटून उद्धव ठाकरे एक पाऊल पुढे आले आहेत असे म्हणत पुढच्या मकरसंक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांसोबत दिसतील, असा दावा रवी राणा यांनी केला. मोदींचे नेतृत्व उद्धव ठाकरेंनी खुल्या मनाने स्वीकारले तर नक्कीच हे होईल, असा विश्वासही राणा यांनी व्यक्त केला. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुढे जाणार आहे. त्यांच्यात नेतृत्वात आगामी महापालिका निवडणुकीत भाजपा-युवा स्वाभिमान पक्ष रिंगणात उतरेल. कुठल्याही निवडणुकीत आम्ही एकत्रित राहू असेही आमदार रवी राणा यांनी सांगितले.

राजकारणात लोकांनी दिलेला निर्णय स्वीकारला पाहिजे. अचलपूरमधून प्रवीण तायडे सक्षम आमदार निवडले आहे. प्रवीण तायडे मतदारसंघात जी काही विकासकामे करतील त्यांना बच्चू कडू यांनी पाठिंबा दिला पाहिजे, अशी आशा रवी राणा यांनी व्यक्त केली. लोकशाहीत पराभव झाल्यानंतर तो स्वीकारून सगळ्यांनी अमरावतीच्या विकासासाठी एकत्र आले पाहिजे. विरोधकांनी तिळगूळ खावे आणि गोड गोड बोलावे, विकासासाठी एकत्र यावे, असे आवाहनही रवी राणा यांनी स्थानिक राजकीय नेत्यांना केले आहे.

मागील अनेक दिवसांच्या घडामोडी पाहता उद्धव ठाकरेंची भूमिका बदलतीये का असा प्रश्न उपस्थित होत आहे. याबाबत अमृता फडणवीस यांनीही भाष्य केले. नेत्यांमध्ये असणारे मतभेद हे विचारधारांबाबत आहेत. त्यांच्या वैयक्तिक पातळीवर ते मतभेद नाहीत. वैचारिक मतभेद असल्याने राजकारणात एकेकाळचा शत्रू असणारा हा मित्र होतो, मग परत शत्रू होतो, परत मित्र होतो अशी कितीतरी उदाहरणे आहेत, असे सूचक विधान अमृता फडणवीस यांनी केले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जानेवारी २०२५


## थायलंड येथील विश्व साहित्य संमेलनात फुले शाहू आंबेडकर साहित्यरत्न पुरस्काराने प्रा. मिलिंद ठोकळे सन्मानीत



**छत्रपती संभाजीनगर :** कला महाविद्यालय बिडकीन येथील प्रा. मिलिंद ठोकळे यांना फुले-शाहू-आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनात साहित्यरतन पुरस्कार देण्यात आला.

विद्यार्थीदशेपासून ते आज पर्यंत खारघर नवी मुंबई संपूर्ण महाराष्ट्रभर फुले शाहू आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विचार पोहोचण्याचे काम सामाजिक बांधिलकीच्या दुष्टीकोणातून करत असतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन सोनवणे फाउंडेशन नाशिक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद यांच्यावतीने फुले-शाहू-आंबेडकर साहित्यरत्न या पुरस्काराने गौरवण्यात आले.

ते मूळचे मु पो. सोनंद या सांगोला जि. सोलापूर या गावचे असून त्यांच्या सामाजिक कार्याचा आलेख ओळखून थायलंडची राजधानी बँकॉक येथे त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांना मिळालेल्या पुरस्कारबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी




**वेरूळ :** येथील श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) मध्ये राजमाता जिजाऊ यांची जयंती व युवकांचे प्रेरणास्थान असलेले स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस "राष्ट्रीय युवक दिन" म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अशा दोन्ही थोर व्यक्तींची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे प्राचार्य श्री बोरसे व्ही.यु. हे होते, तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून प्रा.गुळवे एन. एम.विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक तथा पर्यवेक्षक श्री अधाने गुरुजी हे होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी भाषणे केली. तसेच यावेळी मार्गदर्शक म्हणून असलेले श्री प्रा. गुळवे एन.एम. यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्य सांगून त्यांनी केलेले सामाजिक, साहित्यिक व राष्ट्रीय कार्याची माहिती देऊन राजमाता जिजाऊ यांची माहिती दिली यावेळी "राष्ट्रीय युवक दिन" निमित्त आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच छ. संभाजीनगर जिल्हा स्काऊट गाईड तर्फे आयोजित तेलवाडी, कन्नड येथील मेळाव्यामध्ये सहभागी होऊन तृतीय क्रमांक मिळवलेल्या स्काऊट गाईड विद्यार्थी तसेच त्यांचे प्रशिक्षक तथा क्रीडा शिक्षक श्री सूर्यवंशी गुरुजी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री रामटेके गुरुजी, श्री राहणे गुरुजी, श्री मुळे गुरुजी, श्री देव गुरुजी, श्री सोनकांबळे गुरुजी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रावते वाय.जी.यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री रिठे गुरुजी यांनी केले.




माजी नगरसेवक विजय निकाळजे उर्फ गुड्डू भैय्या यांच्या वतीने पहिल्या फुले, शाहू, आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. ऋषीकेश कांबळे यांच्या सह थायंडमधील संमेलनाला उपस्थित राहून परत आलेल्या सर्वांचे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहरात पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जानेवारी २०२५


## छत्रपती शाहू महाविद्यालयात विभागीय वक्तृत्त्व स्पर्धा संपन्न



**लासूर स्टेशन :** छत्रपती शाहू महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटना व छत्रपती शाहू महाविद्यालय लासूर स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त शाहू महाविद्यालयामध्ये सोमवार दिनांक १३ जानेवारी रोजी युवाविवेक आंतरमहाविद्यालयीन मराठवाडा वक्तृत्त्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी श्री. संदीप भाऊ आमराव व श्री. राहुल कुमार नळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख, श्री.विश्वास भरत पाटील उपस्थित होते.या स्पर्धेसाठी मराठवाड्यातून अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. यामधून पुढील विद्यार्थ्यांनी क्रमांक मिळवले.

व्यंकटराव शेषराव शिंदे, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय नांदेड (प्रथम क्रमांक :- ७०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र) श्रुती गजेंद्र जाधव, बापुजी साळुंखे विधी महाविद्यालय, धाराशिव (द्वितीय क्रमांक :- ५०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र)साक्षी राहूल बागुल, मानिकचंद पहाडे विधी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर (तृतीय क्रमांक :- ३०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र) प्रतिक्षा प्रकाश शेळके, बंकटस्वामी महाविद्यालय, बीड (चतुर्थ क्रमांक :- १०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र) सुषमा बाबासाहेब वाघ, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण (उत्तेजनार्थ क्रमांक :- १०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र) कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्या स्पर्धकांना सरपंच सौ. मीनाताई पांडव, प्राचार्य, डॉ. संदीप धिरडे, मुख्याध्यापक श्री. मनोज धनाड डॉ. संजय थोरात, योगेश गोटे व महेश खेडकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

परीक्षक म्हणून डॉ. संतोष जाधव व श्री. सुरेश कोठुळे यांनी काम पाहिले.

स्पर्धेचे मुख्य संयोजक म्हणून ॲड जालींदर जगताप, कल्पेश गायकवाड, तारा झिम्मन, डॉ. हर्षल पवार, घनश्याम जगताप यांनी काम पाहिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व आजी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्थानिक ऐतिहासिक वारसा समजून घेणे गरजेचे - डॉ रमेश सूर्यवंशी




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुक्यात नैसर्गिक वारसा बरोबरच ऐतिहासिक वारसा ही लाभलेला आहे. दोन हजार वर्षां पूर्वीपासूनचा ऐतिहासिक वारसा या तालुक्यामध्ये आहे. लेणी, मंदिरे, मूर्ती शिल्प व किल्ले या स्वरूपामध्ये हा वारसा आजही पहावयास मिळतो. हा जतन करणे आपले कर्तव्य असल्याचे मत अभ्यासक, संशोधक डॉ. रमेश सुर्यवंशी यांनी व्यक्त केले आहे.

ते दि. १३ जानेवारी रोजी येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा या कार्यक्रमांतर्गत स्थानिक ऐतिहासिक वारसा आणि इतिहासकार वाचक संवाद या विषयावर आयोजित कार्यक्रमात बोलत होते. डॉ. रमेश सूर्यवंशी यांनी आपल्या मनोगतात स्थानिक इतिहासाला उजाळा दिला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले हे होते तर व्यासपीठावर डॉ. अतिष मेहेत्रे उपस्थित होते. डॉ. रमेश सूर्यवंशी यांनी कन्नड तालुक्या बरोबरच अजिंठा सातमाळ डोंगर रांगेत असलेली प्राचीन पितळखोरा लेणी, धारकुंड लेणी, जोगेश्वर लेणी, रुद्रेश्वर लेणी, घटोत्कच लेणी, ऐतिहासिक अंतूर किल्ला, लोंझा किल्ला, पेडका किल्ला, कन्हेर गड, जंजाळा किल्ला, सुतोंडा किल्ला, वेताळवाडी किल्ला, पौराणिक पाटणादेवी मंदिर शिल्प, पिशोर येथील हेमाडपंती महादेव मंदिर, कन्नड शहरातील मंदिरे इत्यादी ऐतिहासिक वास्तूंची माहिती देऊन ती जतन करणे व संवर्धन करणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी हा सर्व ऐतिहासिक वारसा समजून घेतला पाहिजे.

जो आपल्या पूर्वजांनी निर्माण करून ठेवला आहे. स्थानिक नागरिक या नात्याने विद्यार्थ्यांची ही प्रमुख जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी दुर्गम ठिकाणी असलेला ऐतिहासिक वारसा पाहण्यासाठी जात असताना योग्य ती काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ईतिहास विभागाचे प्रमुख डॉ.जगदिश भेलोंडे यांनी केले तर सुत्रसंचलन प्रा. संतोष देशमुख यांनी केले. डॉ राकेश अहिरराव यांनी आभार मानले. याप्रसंगी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने विविध कनिष्ठ महाविद्यालयात 'स्कूल कनेक्ट २.०' उपक्रमाचे आयोजन







**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणी करिता महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने 'स्कूल कनेक्ट 2.0' अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पदवी वर्गाच्या बदलेल्या अभ्यासक्रमाबद्दल आणि त्याविषयी शासनाच्या विविध योजनांबद्दल माहिती व्हावी या हेतूने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यासाठी शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने परिसरातील विविध कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने पदवी संरचनेत झालेले बदल आणि अभ्यासक्रमातील बदल तसेच विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाविषयीची माहिती विद्यार्थ्यांना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी महाविद्यालयात एनईपी सेल स्थापन केला आहे. या सेलचे समन्वयक डॉ. प्रवीण माने आहेत.

सहा जानेवारीपासून या अभियानाची सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातून करण्यात आली. आठ जानेवारी रोजी ज्ञानेश्वर विद्यालय तुरोरी, नऊ जानेवारी रोजी डॉ. के. डी. शेंडगे कनिष्ठ महाविद्यालय उमरगा, दहा जानेवारी रोजी शरचंद्र पवार महाविद्यालय नाईचाकूर तर १३ जानेवारी रोजी मुरूम येथील भारत शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय येथे प्रभावीपणे हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात एनईपी सेलचे समन्वयक डॉ. प्रवीण माने यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बदल समजावून सांगितले.

अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट, तीन-चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम, आंतरविद्याशाखीय विषयांची निवड पद्धती, विविध स्कॉलरशिप, आंतरवासिता, इंटर्नशिप आणि श्रेयांक पद्धती याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्कूल कनेक्ट अभियानात डॉ .डी.बी. ढोबळे, डॉ. सुभाष इंगळे, डॉ. संदिपान सावंत, डॉ. धनराज इटले आणि डॉ. अजित आष्टे यांनी सक्रिय पुढाकार घेऊन हे अभियान यशस्वीपणे राबविले. या अभियानात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, विविध कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जानेवारी २०२५

# थायलंड येथील पहिले फुले-शाहू-आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनातील प्रो. डॉ. ऋषीकेश कांबळे यांचे अध्यक्षीय भाषण




डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद (भारत), पटाया इंडियन असोशिएशन बँकॉक (थायलंड) आणि सोनवणे फाऊंडेशन, नाशिक (भारत) या संस्थांचे मी प्रारंभीच ऋण व्यक्त करतो. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचेही ऋण व्यक्त करतो. या मंडळींनी माझी पहिल्या विश्व फुले-शाहू-आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड केली. त्यांनी माझा जो सन्मान केला त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.खरंतर फुले-शाहू-आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनाची योजना किंवा कल्पना डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. मोहन सोंदर्य या दोघांची. त्यांच्या या कल्पनेला त्यांचे सहकारी आणि सोनवणे फाऊंडेशनचे बापुसाहेब सोनवणे तथा पटाया इंडियन असोशिएशन बँकॉक थायलंडचे अध्यक्ष मा. सुरेश राठी यांनी मूर्तरूप दिले म्हणून हे पहिलं विश्व साहित्य संमेलन संपन्न होत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे.

या संमेलनाचे उद्घाटक थायलंडमधील पाली भाषेचे अभ्यासक आणि बौद्ध तत्वज्ञनाचे विद्वान प्रा. फ्रापलाड सोरावित अफिपन्यो यांनी संमेलनाच्या उद्घाटनाची जबाबदारी स्वीकारली त्याचाही आपण आनंद व्यक्त केला पाहिजे.बंधू आणि भगिनींनो...!इ. स. पूर्वकाळात भारतातील समाज जेव्हा विषमतेने ग्रासलेला होता आणि शोषणाने त्रस्त होता, अशा काळात बुद्धांचा आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा उदय झालेला आहे. समाजामध्ये अराजक मोठ्या प्रमाणात होतं, भेदाभेद होता विषमता तसेच शोषणही मोठ्या प्रमाणात होतं. जगाच्या पाठीवर भारत असा एक देश आहे की, ज्या देशातील समाज हा श्रेणीबद्ध होता. वैदिक धर्मविचारांनी ही श्रेणीबद्धता निर्माण केली होती. धर्म आणि धर्मग्रंथांनी ही श्रेणीबद्धता अधिक बळकट आणि मजबूत केलेली होती.

चिंतेचा प्रश्न श्रेणीबद्धतेचा नाही. या श्रेणीबद्धतेनं चार वर्ण निर्मिलेआणि दोन उपवर्ण, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण. यात केवळ ब्राह्मण या वर्णाला सर्वाधिकार देऊन अन्य तीन वर्णिकांचा छळ होईल, त्यांचे मानवअधिकार हिसकावले जातील अशीच सिद्धता केली, रचना केली. अन्य दोन उपवर्णात चांडाल आणि निषाद यांचे तर शूद्रांपेक्षाही अधिक हाल या धर्मसंस्था आणि धर्मग्रंथांनी केले. तीन वर्ण आणि दोन उपवर्ण यांना कोणतेच मानव अधिकार (Human Rights) ठेवले नाहीत. माणसाच्या सावलीचा विटाळ होईल अशाच पद्धतीनं समाजसंस्थेची रचना करण्यात आली.माणसाचा स्पर्श माणसाला जर झाला दूर ते अशुभ तर मानलं गेलंच पण त्याच स्पर्शाने समाजातल्या वरच्या स्तरातला माणूस अपवित्र होतो ही भावना दृढ करण्यात आली.

समाजातल्या खालच्या स्तरातल्या माणसाला सांगण्यात आलं की, तुला मिळालेला हा जन्म मागच्या जन्माच्या तुझ्या कर्माचं फळ आहे. युगानुयुगे खालच्या स्तरातलाही माणूस याच समजूतीत आपलं जीवन व्यतीत करीत होता. म्हणूनच संत चोखामेळा यांनी म्हटलं होतं, 'कृष्णनिंदा घडली होती। म्हणूनच हा जन्मप्राप्ति।' चुकून एखाद्याने बंडखोरी केली तर त्याला देहदंडाची, मृत्युची शिक्षा दिली जात असे. ही शिक्षा सार्वजनिक ठिकाणी दिली जात असे. धर्माचा आदेश म्हणून, धर्मग्रंथाचा आदेश म्हणून असा हा जबर दंड दिला जात असे. याचा अर्थ असा की, समाजव्यवस्था असो की जाचक सामाजिक प्रथा असो, त्याच्याविरुद्ध कुणीही बंड पुकारता कामा नये. ही धर्म आणि धर्मग्रंथ पुरस्कृत सामाजिक गुलामगिरीच होती.तसं पाहिलं तर गुलामगिरी ही जगभरच पसरलेली होती, पण जागतिक मानवी गुलामगिरी आणि भारतीय सामाजिक गुलामगिरीमध्ये मूलभूत फरक आहे.

जगात पसरलेली गुलामगिरी ही मानवी व्यवस्थेने निर्माण केलेली गुलामगिरी होती. राजेशाही जगभरच होती. या राजेशाहीनं, सामंतशाहीनं या गुलामगिरीला जन्म दिलेला होता. भारतातील सामाजिक गुलामगिरी मात्र मानवी व्यवस्थेनच निर्माण केलेली असली तरी ती गुलामगिरी माणसाने निर्माणच केली नाही असेचभासविण्यात आले. धर्मग्रंथ हे अपौरुषीय आहेत म्हणजेच या ग्रंथाचं निर्माण माणसांनी नव्हे तर हे धर्मग्रंथ परमेश्वराने निर्मिले आहेत असाच युगानुयुगे मारा करण्यात आला. त्यामुळे या सामाजिक गुलामगिरीत खितपत पडलेला माणूस हे आपलं प्राक्तनच आहे, हेच नशीब आहे आणि हे भोग आपल्याला परमेश्वरानेच दिलेले आहे या समजुतीमुळे तो या प्रथा-परंपरेच्या विरुद्ध बंड करू शकला नाही. अमेरिकेतल्या निग्रांची ब्लॅक समाजाची गुलामगिरी भीषण होती, दाहक होती, परंतु ही गुलामगिरी मानवनिर्मित होती.

भारतातील सामाजिक गुलामगिरी ही धर्म आणि धर्मग्रंथ पुरस्कृत होती. त्यामुळे भारतातल्या गुलामगिरीनं मानवी मनाचाच ताबा घेतलेला होता. अमेरिकेतील मानवनिर्मित गुलामगिरी आणि भारतातील दैववादाशी जोडलेली गुलामगिरी यात कमालीचे अंतर आहे. हा फरक निर्देशित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी असं म्हटलं होतं, 'It is beyond that this slavery is hundread percent better than the untouchability' याचा सरळ अर्थ असा आहे की, भारतातील गुलामगिरीला जसं धर्म आणि धर्मग्रंथाचं पाठबळ आहे तसं ही मानसिक गुलामगिरी असल्यामुळं गुलामगिरीच्या अनंत यातना भोगणाऱ्या व्यक्ती असो की, समूदाय तो या व्यवस्थेविरुद्ध बंड करु शकला नाही. हा धर्म होता वैदिकांचा. वैदिकांच्याच धर्मग्रंथानी जशी विषमता पेरली, भेदाभेद निर्माण केला आणि अमानुष असं त्यांचे मानवी शोषण करण्यात आले. या समुदायाला शूद्रातिशूद्र असं संबोधल्या गेले. या धर्मग्रंथानी या शूद्रातिशूद्रांचे जसे मानवअधिकार नाकारले तसे त्यांनी स्त्रियांचेही मानव अधिकार नाकारले. स्त्रियांना 'तर त्यांनी 'पाप योनी' असं संबोधले जो दर्जा शूद्रातिशूद्रांचा तोच दर्जा स्त्रियांचा या सगळ्यांचं समुदायाला उपनयन नावाचा संस्कार नाकारला गेला. ज्यांचा उपनयन संस्कार नाही त्यांना शिक्षणाचाही अधिकार नाही.ही क्रूर अशी व्यवस्था होती.

या व्यवस्थेच्या विरुद्ध इ. स. पूर्व पावणे सहाशे वर्षापूर्वी बंड पुकारलं ते महावीर जैन या भारतातल्या समाजसुधारकाने आणि इ. पूर्व साडे पाचशे वर्षापूर्वी बंड पुकारलं ते तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धाने. महावीरजैनांच्या कठोर अशा अहिंसा तत्वज्ञानामुळे जैन धर्म भारतभूमीच्या पलीकडे विस्तार पावू शकला नाही. बुद्धानं मात्र त्यांच्या तत्वज्ञानाला धर्माचं रूप दिलं नाही. बुद्ध म्हणाले, 'मनुष्य हा जन्मतःच स्वतंत्र आहे आणि प्रत्येक व्यक्तिला जगण्याचा अधिकार आहे. बुद्धाची तत्वप्रणाली मध्यम स्वरूपाची जीवनपद्धती म्हणून मानली गेलेली आहे. बुद्धानं वैदिक प्रणित पुरोहितशाही नाकारली आणि धम्माचा अंगिकार कोणत्याही व्यक्तिला करता येईल असे विदित केलं, सांगितलं. बुद्धाच्या तत्वज्ञानात प्रज्ञा, शील, करुणा ही मानवी मूल्ये जशी आपल्याला दिसतात तसं स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही जीवनमूल्ये ही आपल्याला ठळकपणे दिसतात.

पुढील पानावर....

## मागील पानावरून...

कोणत्याही जातीच्या आणि कोणत्याही धर्म संप्रदायाच्या व्यक्तिला मग ती व्यक्ती असामान्य असो की, सामान्यातली सामान्य असो. त्याला धम्माचा अंगिकार करता येऊ शकतो. अशा व्यवस्थेमुळं बौद्ध धम्म हा जगभर पसरु शकला. बौद्ध धम्म भारताबाहेरच्या भूमीत जेव्हा प्रवेशला तेव्हा जगभरही त्या त्या समुदायाचे संप्रदायही होते. बुद्धाच्या तत्त्वज्ञानातल्या लवचिकपणामुळे बौद्ध धम्म हा कोणत्याही संप्रदायाला जीवन मार्ग म्हणून अंगिकारता आला. भारत ही बुद्ध भूमी आणि थायलंड ही बौद्ध तत्वज्ञानानं भारावलेली भूमी.

बुद्धांनी धम्माचं रोपटं लावलं भारतात, पण हे रोपटं वृक्ष होतं त्याच्या फांद्या मात्र पसरल्या जगभर.बुद्धानं भारतातल्या धर्म ग्रंथाची संस्कृत ही भाषा नाकारली आणि त्यांनी त्याचं तत्वज्ञान तत्कालीन प्राकृत म्हणजेच त्या काळातल्या सर्वसामान्य माणसांची बोलीभाषा असणाऱ्या पाली या भाषेतून आपलं तत्वज्ञान कथन केलं. त्यामुळे सर्वसामान्यालाही बौद्ध धम्माच्या जीवनपद्धतीचा सहज अंगिकार करता आला. बुद्धाची ही भाषिक बंडखोरी सुद्धा होती. मध्ययुगाच्या काळात महाराष्ट्रातल्या संत ज्ञानेश्वर यांचीही बाराव्या शतकात अशीच भाषिक बंडखोरी राहिलेली आहे. धर्मग्रंथांची असलेली संस्कृत ही भाषा ज्ञानेश्वरांनीही नाकारली आणि मध्ययुगात सर्वसामान्य माणूसही मराठी बोलत होता, त्या भाषेतून त्यांनी आपला आविष्कार केला. पण भाषिक बंडखोरीचा आद्यत्वाचा मान हा तथागत बुद्धाकडेच जातो. तथागताने पाली भाषेतून आपलं तत्वज्ञान कथन केल्यामुळं ते थेट सर्वसामान्य माणसाच्या हृदयाला भिडलं आणि त्याने बुद्धाच्या तत्वज्ञानाचा आणि त्यांनी सांगितलेल्या जीवन पद्धतीचा अंगिकार केला.

हे मन्वंतर केवळ बहुजन समाजापुरतं सीमित नव्हतं. बुद्धाच्या तत्वज्ञानाचा स्वीकार ब्राह्मण समुदायानेही मोठ्या प्रमाणात केला. बुद्धानं सांगितलेला जीवन मार्ग एखाद्या समुदायापुरता मर्यादित नव्हता, तो समस्त मानवी कल्याणाचा मानवी अभ्युदयाचाच मार्ग होता. मनातलं अराजक आणि समाज जीवनातली अराजकता कशी संपवावी हे बुद्धानं शास्त्रोक्त पद्धतीनं सांगितलं. जीवनातील सर्व प्रकारची हिंसा तथागतानं नाकारली. जीवसृष्टीतील, चराचरातील केवळ मनुष्यमात्र नव्हे तर तथागताने कृमी किटक, पशूपक्षी आणि प्राणी यांच्यावरही माया करायला शिकवलं. त्याकाळी यज्ञयाग केला जात असे आणि त्यात प्राण्यांचा बळी दिला जात असे ही प्रथा बुद्ध प्रत्यक्ष अनुभवत होते. जीव हा मनुष्याचा असो की प्राण्याचा जीव तो जीवच! ही तथागत बुद्धाची धारणा होती.

बुद्धाचं तत्वज्ञान वैज्ञानिकतेच्या पायावर उभं आहे. विज्ञानात प्रयोगशिलता आणि अनुभूती ही दृगोचर झालेली असते. म्हणूनच, बुद्धाने हे निक्षून सांगितलं की, मी सांगतो म्हणून तुम्ही सत्य मानू नका. मी जे काही सांगितलं आहे त्याचा अनुभव घेऊन त्याची अनुभूती घेऊन तुम्हाला जाणवलेलं सत्य, तेच सत्य माना असा बुद्धाचा सांगावा होता. त्या काळात ज्या भित्र तत्वधारा होत्या त्या कोणत्याच तत्वधारेचा अशा प्रकारचा निष्कर्ष नव्हता, सांगावा नव्हता.बुद्धाने विवेकदृष्टीला विशेष महत्व दिले. विवेकामुळेच आपल्याला चांगल्या-वाईटाची पारख करता येते. आपल्या आयुष्यासाठी आणि आपल्या कल्याणासाठी काय हितावह आहे? आणि काय अपायकारक आहे? याचा विचार करता येतो. अविवेकात व्यक्तिगत पातळीवरचा हितनिर्णय असू शकतो, पण तो समष्टीसाठी हितावह असेलच, असे नाही. बुद्ध हे व्यक्तिच्या कल्याणाबरोबर मानवी कल्याणाला विशेषत्वाने महत्व देतात. बुद्धाची विवेकवादी दृष्टी ही बुद्धिप्रामाण्याकडंनेणारी आहे. बुद्धिप्रामाण्य गृहीत धरलं तर बुद्धीला पटेल आणि व्यक्ती ते समष्टी यांना अपायकारक नसेल असा विचार बुद्धिप्रामाण्यात केला जातो ही आपण माणूस असल्याची खूण असते.बुद्ध हे मानवीमन आणि मानवी वर्तनाचे जीवसृष्टीतील पहिले भाष्यकार आहेत, मन हे आकार-विकाराने व्यापलेले असते. मनामध्ये सुष्ट विचार असतात तसे दुष्ट विचार असतात. सुष्ट विचार असतील तर कल्याण साधता येते. तर अन्यायाचा मार्ग अवलंबिला जातो. बुद्धाने मानवी मनाचा सूक्ष्म असा अभ्यास केला आहे. तसं त्यांनी मानवी वर्तनाचाही तपशिलाने अभ्यास केला त्यांच्या असं लक्षात आलं की, मानवी सृष्टीमध्ये करुणेपेक्षा हिंस्त्रताच अधिक आहे. म्हणूनच बुद्धानं करुणेला महत्व दिलं.

प्रज्ञा असल्याशिवाय करुणा फलद्रूप ठरत नाही, प्रज्ञेत विवेक सामावलेला असतो. आणि विवेक हा करुणेला अधिक बळकट करतो. करुणा हिंसेचा अवरोध आहे, तर प्रज्ञा बुद्धीचं लक्षण आहे.जीवसृष्टीत दुःख अपार आहे, दुःखाचं अस्तित्व नाकारताच येत नाही. दुःखाला लांबी रुंदी नसते. दुःखाला जडत्व नसतं तसं हलकेपणही नसतं. दुःख हे दुःखच! भदंत कश्यपाने तथागत बुद्धांना प्रश्न केला होता, जीवसृष्टीतील अमीट सत्य काय? तर बुद्ध म्हणाले, "दुःख हे जीवसृष्टीतील अमीट सत्य आहे. दुःखाची तीव्रता कमी करता येऊ शकते, परंतु दुःखाचं अस्तित्व कमी नाही करता येऊ शकत. जीवसृष्टीतला असा एकही जीव नाही की, ज्याला दुःख स्पर्शिलं नाही म्हणूनच आपल्याला असं म्हणता येईल, 'उभे असतो आपण सगळेच वेदनेच्या विराट यात्रेतदुःखाला नसतो ठाव अन यातनेशिवाय असत नाही असे एखादेही गाव.'(डॉ. ऋषीकेश कांबळे) तथागत बुद्धाने जीवनात दुःख अपार आहे हे जसं सांगितलं तसं त्यांनी दुःख नाशाचा मार्गही सांगितला. त्यांनी दुःख उत्पत्तीचं मूळ सांगितलं. हे मूळ म्हणजे तृष्णा, आपल्या भाषेत सांगायचं झालं तर हावरटपणाची हाव म्हणजे तृष्णाहोय. तृष्णामुक्ती झाली तर दुःख सौम्य करता येऊ शकतं. तथागताचं हे तत्वज्ञान इ. स. पूर्व काळातील जग असो की इ. स. नंतरचे जग असो त्यांनी ते स्वीकारलं.

मित्रहो...!आपला अभ्युदय झाला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे. बाबासाहेब आंबेडकर हे आपलं जीवित आहे, श्वास आहे. शतावधी वर्षापासून सामाजिक तुरुंगवासात खितपत पडलेला समाज समुदाय केवळ बाबासाहेबांच्यामुळेच तुरुंगवासातून बाहेर पडू शकला. तथागत बुद्धानंतर अनेक संत झाले, अनेक तत्वज्ञ झाले, अनेक महापुरुष झाले पण अस्पृश्य आणि दलित पददलिताचं आयुष्य ते बदलू शकले नाहीत. केवळ बाबासाहेबच या मंडळीचं आयुष्य बदलू शकले. त्यांची जीवनदृष्टी बदलू शकले.

स्वतःकडे आत्मप्रतिष्ठेने पाहण्याचा दृष्टिकोन डॉ. बाबासाहेबांनी त्यांना प्रदान केला. ही नवदृष्टी होती आणि नवजीवनही होते. मनात बदल झाल्याशिवाय वर्तनात बदल घडत नसतात, पिचलेला, गलितगात्र झालेला समुदाय आत्मसन्मानाने, आत्मस्वाभिमानाने उभा राहिला होता. त्याने जुलमी, शोषक व्यवस्थेच्या विरुद्ध प्रखर असं बंड पुकारलं. मानवमुक्तीचा लढा बाबासाहेबांच्या प्रेरणेने उभा राहू शकला. बाबासाहेबांच्या युगोत्तर अशा कार्यकर्तृत्वाचा वामनदादा कर्डकांनी अत्यंत समर्पक अशा शब्दात गौरव केला आहे.

वामनदादांनी लिहिलं होतं,'उध्दरली कोटी कुळे भिमा तुझ्या जन्मामुळे जखडबंद पायातील साखळदंड तडातड तुटले तू ठोकताच दंड झाले गुलाम मोकळे भिमा तुझ्या जन्मामुळे.'शतावधी वर्षाची गुलामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुळे संपुष्टात आली. बाबासाहेबांनी तर आपल्याला बुद्ध, कबीर आणि म. फुले यांची ओळखकरुन दिली. बाबासाहेब ही आपली प्रेरणा असली तरी बुद्धाचं तत्वज्ञान, कबीरांचा विचार आणि म. फुले यांचे सिद्धांत आपल्याला बाजूला सारता येत नाही. मानवतावाद हा सगळ्या महापुरुषांच्या चिंतनाचं प्राणतत्व मानता येईल.

**पुढील पानावर....**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १५ जानेवारी २०२५

**मागील पानावरून ....**

तथागत बुद्ध आणि महात्मा फुले यांना जसा समाज बुद्धिप्रामाण्यवादी हवा होता तसाच तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही हवा होता. देव आणि देव नाकारल्याशिवाय मनुष्याचा उद्धार होऊ शकत नाही यावर त्यांचा अढळ विश्वास होता.देव आणि देव या धारणा मनुष्याचे आयुष्यचं लुळं पांगळं करतात, अशी त्यांची पक्की समजूत होती. तथागत बुद्धांनी विदित केलेली मानवी मूल्ये आणि तथागताच्या चिंतनात आलेली लोकशाही जीवनप्रणालीची जीवनमूल्ये हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चिंतनाचा गाभा आहे.मित्रहो!समाज एकजिनसी करायचा असेल, सामाजिक स्वास्थ्य निर्माण करायचं असेल तर करुणा आणि मैत्री ही मानवीमूल्ये आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय ही जीवनमूल्ये पायाभूत ठेवूनच आपल्याला समाजाची जडणघडण करावी लागेल.

आपल्या साहित्याला भले कुणीही प्रचारकी थाटाचे साहित्य म्हणू देत पण मनुष्य त्याचं जीवन जगणं आणि त्याचं भावविश्व हाच आपल्या साहित्याचा गाभा असला पाहिजे, मनुष्य आणि त्याची प्रतिष्ठा ही आपल्याला आपल्या साहित्यातून वगळता येऊ शकत नाही.

१९ व्या शतकात सामाजिक अभिसरणासाठी मोठ्या प्रमाणात वैचारिक मंथन झालेलं होतं. समाजातील ज्या कुप्रथा होत्या त्याचा पुनर्विचार करण्यासाठी हे वैचारिक मंथन होतं. रुढी परंपराची कालसुसंगतता आणि कालबाह्यता अशा दृष्टीनं ही वैचारिक मांडणी होती. या सगळ्या मंथनाच्या मुळाशी म. फुले यांनी दिलेली सैद्धांतिकता होती. समाजातील जे दुबळे आहेत, वंचित आणि उपेक्षित घटक आहेत त्यांच्या आणि स्त्रियांच्या आत्मसन्मानाचा त्या काळातल्या सुधारकांनी आपल्यालेखणीच्या ऐरणीवर घेतला होता, दलितोद्धार आणि स्त्रियाचं मनुष्यत्व याची अतिशय शाखशुद्ध मांडणी या सुधारकांनी केली. न्या. महादेव गोविंद रानडे, न्या. काशिनाथराव तेलंग, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, कृष्णराव भालेकर, गोपाळबाबा वलंगकर, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे, यांनी सामाजिक अभिसरणासाठी दिलेले योगदान आणि केलेले लेखन आपल्याला बाजुला कसं सारता येईल? खरंतर ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथच भारतीय स्त्रीवादाची मांडणी करणारा ग्रंथ आहे.

पण आपण सगळेच भारतीय स्त्रीवादाची मांडणी करावयाला थिटे पडलो. विसाव्या शतकाच्या मध्यात आपल्याला पाश्चात्य जगताकडून स्त्रीवाद आयात करावा लागला इतके आपण करंटे आहोत. या मंडळींच्या आमुलाग्र बदलाच्या किंवा परिवर्तनाच्या दिशेने जे लेखन केलं ते जेवढं चिंतनीय होतं तेव्हढच ते मूलगामी होतं. मानवी वर्तनाच्या पुर्नविचारांची मांडणी त्या लेखनात प्रतिबिंबित झाल्याचं आपल्याला दिसून येतं.म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना २४ सप्टेंबर १८७४ रोजी केली. त्यानंतर मराठी साहित्यात एक नवं दालन निर्माण झालं, सत्यशोधकीय चळवळीबरोबरच सत्यशोधकी जलसे निर्माण झाले. या जलशांनी धर्म, समाज आणि संस्कृतीची कठोर चिकित्सा केली. पुरोहितशाही आणि धर्माच्या आडून होणाऱ्या शोषणाला प्रखर विरोध केला, त्याच्या विरुद्ध बंड केलं. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांनी 'देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे' ही पुस्तिका लिहून पुरोहितशाहीच्या बंडाला अधिक प्रखर केलं.

पुरोहितशाहीच्या प्रखर विरोधाबरोबर एका जातीविषयीचा द्वेष मोठ्या प्रमाणात निर्माण केला गेला. आपण पुरोहितशाहीला विरोध करतो की ब्राह्मण समाजाचा द्वेष करतो याचं भानच सत्यशोधक समाजाला राहिलं नाही. वस्तुतः ब्राह्मणशाही आणि ब्राह्मण्याला नाकारायला हवं होतं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या चळवळीवर भाष्य करताना असं म्हटलं होतं की, "एखादी चळवळ द्वेषावर उभी करता येईलही पण ती चळवळ अल्पजीवी असते." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं हे विधान परिवर्तनाचा रथ ओढणाऱ्या आणि समाजातबदल घडवू पाहणाऱ्या सर्वच कार्यकर्ते, अभ्यासकांनी तथा चिंतकांनी लक्षात घेणं गरजेचं आहे.आज भारतामध्ये उजव्या विचारांची शक्ती वाढते आहे. धार्मिक पुनरुज्जीवनाचा डंका पिटला जातो आहे.

भारतात प्रमुख सात धर्म, पंचवीस संप्रदाय, पंचवीस पंथ आणि जवळपास आठ हजार जाती आहेत. भय वाटावं असं सामाजिक पर्यावरण निर्माण केलं जात आहे. या पुनरुज्जीवनवादी शक्ती फुले-शाहू- बाबासाहेब, शिवराय आणि मार्क्स यांच्या शस्त्राने परत कराव्या लागतील. त्यांच्याशी संघटितपणे झुंजावे लागेल. पण ही झुंज देताना बाबासाहेबांनी निर्देशित केलेली मूल्यात्मकता याचा विसर आपल्याला पडता कामा नये. बाबासाहेब आंबेडकरांनी असंख्य सवर्ण कार्यकर्ते आपल्या समवेत ठेवलेले होते. त्यात ब्राह्मण होते, मराठा होते, ओबीसी प्रवर्गातील लोक होते. खिश्चन, मुस्लिमसह भटके विमुक्त आणि आदिवासीही होते. बाबासाहेबांनी महाडचा सत्याग्रह घोषित केल्यानंतर ब्राह्मणेत्तर चळवळीचे थोर नेते केशवराव जेधे आणि दिनकरराव जवळकर यांनी सत्याग्रहाला पाठिंबा देणारं सहा कलमी अटीचं एक पत्रक प्रसिद्ध केलं आणि त्यात या सत्याग्रहात ब्राह्मणांना सामील करून घेऊ नये. त्यांना सामील करून घेतले तर आम्ही सामील होणार नाही. आमचा बाहेरुन पाठिंबा राहिल असं त्या पत्रकात नमूद केलं. बाबासाहेबांनी या भूमिकेचा समाचार घेताना असं म्हटलं होतं की, आमचा कटाक्ष ब्राह्मण्यावर आहे. ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मणेत्तर आम्हाला दूरचा वाटतो आणि ब्राह्मण्यरहित ब्राह्मण आम्हाला जवळचा वाटतो. विसाच्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेली ही भूमिका सामाजिक पूल बांधताना आपल्याला विचारात घ्यावीच लागते. निर्माण केल्या गेलेल्या डोलाऱ्यात सामाजिक भयकंपित पर्यावरणात उदार मतवादी ब्राह्मणांची कोंडी झालेली आहे. त्यांचे सॅन्डविच झालेलं आहे. ३५- ४० वर्षापूर्वी समाजाचं स्थित्यंतर आणू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांची एक मोठी फळी सगळ्या जाती आणि समाजात निर्माण झालेली होती. विश्वासाचं नातं पुन्हा स्थापित करावं लागेल.मित्रहो.....!सत्यशोधकी जलशांनी धर्म, समाज, संस्कृती आणि व्यवहार याची जी चिकित्सा केलेली होती, तो वसा आंबेडकरी जलशांनी स्वीकारला आणि समाजाचं अतिशय निष्ठेने जागरण केलं, प्रबोधन केलं. स्वातंत्र्याचा लढा जोमात आलेला होता.

आज ना उद्या ब्रिटिशांच्या मगरमिठीतून भारत देश सुटेल अशी आशेची किरणे दिसू लागलेली होती. सामाजिक समतेच्या दृष्टीने लोकप्रबोधनाचे वेध जवळपास सर्वच राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनाना लागलेले होते. आंबेडकरी जलशांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचा मानवमुक्तीचा विचार केंद्रवर्ती ठेवून आणि मनुष्य तथा मनुष्यात्वाला प्रतिष्ठा देत हे आंबेडकरी जलसे सादर होत होते. हे आंबेडकरी युग आणि गांधी युग होतं. महात्मा गांधी यांची 'रामराज्या'ची कल्पना आणि बाबासाहेब आंबेडकरांच्या 'संसदीय लोकशाही'चा विचार बाबासाहेबांचा मानवी प्रतिष्ठेचा विचार या जलशांनी जोरकसपणे मांडून गांधीजीच्या रामराज्याच्या संकल्पनेतील फोलपणा या जलशांनी उजागर केलेला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर या जलशाची जागा भीमगीतकारांनी घेतली आणि त्यांनी बाबासाहेबांचं व्यक्तिमत्त्व, त्यांच्या चळीवळीचं उद्दिष्ट, त्यांच्या तत्वज्ञानातील मूल्ये या मंडळींनी सर्वसामान्य लोकांपर्यंत घेऊन जाण्याचं महत्कार्य केलेले आहे.

**पुढील पानावर....**

# मागील पानावरून....

दलित साहित्याच्या उदयापूर्वी १९ व्या आणि विसाव्या शतकात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक अभिसरणाचं जे मंथन झालेलं होतं ते दलित साहित्यानं अंगिकारलं. व्यक्ती आणि समाजाच्या यातना या साहित्याने जोरकसपणे प्रकट केल्या, बुद्ध, फुले, शाहू आणि बाबासाहेब विशेषत्वाने बाबासाहेबांची मानवी मुक्ती आणि मानवी प्रतिष्ठा केंद्रिभूत ठेवून हे साहित्य अभिव्यक्त झालं. बाबासाहेबांचं तत्त्वज्ञान स्वीकारलं की आपसूकपणे बुद्धाचा मानवतावाद स्वीकारावाच लागतो. प्रारंभिक दलित साहित्य हे दमनकारी व्यवस्थेच्या विरुद्ध प्रपातासारखंधबधब्यासारखं व्यक्त झालं. त्या व्यवस्थेविरुद्धचा रागही होता आणि या व्यवस्थेच्या बदलाची भूमिका ही त्यात आविष्कृत झालेली होती.

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आज जगभरचा समाज बदलू लागलेला आहे. देशोदेशात युद्ध सदृश्य वातावरण निर्माण झालेलं आहे. ७५ वर्षापूर्वी भारताने पूर्वपरंपरेची साथ नाकारून माणसाला मोकळा श्वास घेता येईल अशा प्रकारची व्यवस्था स्वीकारलेली होती. त्यात माणसाच्या स्वातंत्र्याची हमी होती, त्यात बंधुभावाचा उद्गार होता, समतेच्या दिशेने वाटचाल होती आणि न्यायाची भूमिका भारतीयांमध्ये तयार झालेली होती. हे सगळंच बदलून भारताला पुन्हा एकदा विषमतेच्या खाईत, शोषणाच्या अग्निकुंडात आणि धार्मिक, सांस्कृतिक तुरुंगवासात ढकलणाऱ्या प्रवृत्तींनी उच्छाद मांडलेला आहे. मुक्ती हवी की साखळदंड हवे याचा विचार भारतीयांनीच करण्याची गरज आहे.आज भारतातला असो की, मराठी भाषिक लेखक असो तो आपलं मत मांडायला कचरतो आहे, भीतोय, दहशतीच्या सावटाखाली तो वावरतोय. बाबासाहेब म्हणत असत, अन्यायाविरुद्ध बोलायला आपलं मत व्यक्त करायला घाबरुन तुम्ही मूक राहिलात तर गुलामगिरी तुमच्यापासून फार दूर राहणार नाही."

बाबासाहेबांनी दिलेला हा इशारा प्रत्येक भारतीय तथा जगातल्या नागरिकांनी लक्षात घेण्याची गरज आहे.कवी, लेखक, चिंतक, अभ्यासक आणि कार्यकर्ते यांची जबाबदारी तर फार मोठी आहे. भारतीय संविधानाने दिलेला मतस्वातंत्र्याचा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार जर दाबला जात असेल तर आपण मूक बसून कसे चालेल? व्यक्त झालंच पाहिजे आणि नागरिकांच्या सर्व प्रकारच्या अधिकारासाठी आपली लेखणी आपण उचलली पाहिजे. शेवटी स्वातंत्र्य आणि मानवता याची आपण बूज राखणार आहोत की नाही? स्वातंत्र्याच्या आडून पारतंत्र्याची किरणे जर फेकली जात असतील तर या दुष्टाव्याचा प्रतिकार करणे गरजेचे आहे. मनुष्य आणि त्याचं स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच आहे. भारतीयसंविधानाची आणि भारतीय लोकशाहीची जगभर कौतुकानं चर्चा सुरु असतानाच भारतात मात्र संविधानाच्या आणि भारतीय लोकशाहीच्या चिंधड्या उडवल्या जात आहेत. हे अत्यंत खेदजनक आहे.

समाजाच्या सर्वथैव हितासाठी लेखक भित्रा नव्हे निर्भय असला पाहिजे, या दृष्टीने आपली कथा, कविता, समीक्षा आणि वैचारिक लेखन आलं पाहिजे, कलेच्या माध्यमातूनही या प्रबोधनाची आज नितांत गरज आहे.या प्रसंगी आनंदही व्यक्त केला पाहिजे की, भारत सरकारने मराठी भाषा आणि पाली भाषेला अभिजात (क्लासिकल लँग्वेज) दर्जा बहाल केला. मानवी प्रतिष्ठेचं, मानवतावादाचं आणि माणसाच्या मनाची जोपासना करणारं तत्वज्ञान ज्या पाली भाषेत सांगितलं गेलं आहे त्या भाषेला भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला त्याबद्दल भारत सरकारचं आणि पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी याचं आपण कौतुकाने अभिनंदन करूया.मित्रहो...!महात्मा फुले यांनी त्यांचा गुलामगिरी हा ग्रंथ १९ व्या शतकात मानवी मुक्तीसाठी झुंजणाऱ्या निग्रो समाजाला अर्पण केलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर जगभरातल्या शोषितांच्या मुक्तीसाठी करुणेनं लेखन केलं आहे. सर्वसामान्य माणसाला सुख मिळावं याच्यासाठी रेल्वेचा रुळ टाकणारा, यातनामय आयुष्य घेऊन जगणारा 'गंगमन' तो भारतातला असो, अमेरिका, ग्रेट ब्रिटनमधला असो, फ्रान्स किंवा आशिया अथवा कुठल्याही खंडातला असो त्याचं जगणं आणि त्याचं दु:ख समसमानच आहे.

त्या त्या प्रदेशात हे शोषितच आहेत. त्यांना सुखानं जगता यावं यासाठी फुले-शाहू-आंबेडकरांचा विचार आहे.आज बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाला पाया मानून श्रमिकांचे लढे सुरु आहेत. बाबासाहेब मान्य केला की, घाम गाळणाऱ्या माणसांच्या मुक्तीचा विचार आपोआप येतो, त्यात महात्मा फुलेही असतात, राजर्षी शाहूही असतात, कार्ल मार्क्सही असतो आणि या संवेदनेचं शेवटचं टोक करुणा असते म्हणून त्यात बुद्धही आपल्याला ठळकपणे जाणवतो. म्हणून बाबासाहेब ही काही केवळ भारताची मक्तेदारी राहिलेली नाही. जो मनुष्य घाम गाळतो तिथं बाबासाहेब आणि जिथं कुठं माणसांचा सन्मान व्हावा असं वाटतं तिथं बाबासाहेब.

बाबासाहेब आंबेडकर हेकेवळ भारतातल्याच शोषित आणि श्रमिकांचा ऑक्सिजन नाही तर ते जगातल्या शोषित आणि श्रमिकांचं ऑक्सिजन होत चाललेले आहेत, आपण फक्त त्यांनी निर्देशित केलेल्या विचारांशी निष्ठा ठेऊन वागू या. इमानदार राहू या.बंधु भगिनींनो या विश्व साहित्य संमेलनात सिने अभिनेत्री प्रतिभा आहेर या माता रमाईवरचा एकपात्री प्रयोग सादर करणार आहेत. त्यांनी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनादिवशी ऐतिहासिक औरंगाबादच्या बुद्ध लेणी परिसरात हा प्रयोग सादर केला होता, तो मी अनुभवला आहे. अत्यंत सहृदयतेने त्या हा प्रयोग सादर करीत असतात तो अनुभव आपण बँकॉक सारख्या थायलंड देशाच्या राजधानीत घेणार आहोत. शिवाय अभिनेते डॉ. दिलीप वाघ हे सुद्धा एकपात्री नाटक सादर करणार आहेत तोही अनुभव आपण घेणार आहोत, अतिशय महत्वाचे दोन परिसंवाद होणार आहेत. त्यात प्राचार्य अश्रू जाधव यांच्या अध्यक्षतेखाली होणारा 'फुले-शाहू- आंबेडकरी विचारांचे सूत्र' बौद्ध तत्त्वज्ञानात आणि प्राचार्य डॉ. माधव गादेकर यांच्या अध्यक्षतेखाली होणारा 'मानवी कल्याणाचे तत्त्वज्ञान' पाली भाषेत असे अतिशय मौलिक असे दोन परिसंवाद होणार आहेत. उद्बोधक असं कविसंमेलनसुद्धा होणार आहे. त्याचाही समरसून आपण आनंद घेऊ या.

आपण मला शांतपणे ऐकून घेतल्याबद्दल आपले आभार मानतो आणि या पहिल्या विश्व साहित्य संमेलनाचा मान आपण मला दिल्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद, पटाया इंडियन असोशियन पटाया आणि सोनवणे फाऊंडेशन, नाशिक या तीनही संस्थांचे मी अंतःकरण पूर्वक ऋण व्यक्त करतो. धन्यवाद.... जयभीम.... जयभारत...

**डॉ. ऋषीकेश कांबळे**
**अध्यक्ष**
पहिले फुले-शाहू-आंबेडकरी
विश्व साहित्य संमेलन, बँकॉक,
थायलंड.